# चर्चगेट ते हुतात्मा चौक ६४८ मीटर भुयारीकरण पूर्ण

मुंबई मेट्रो रेल महामंडळाने (एमएमआरसी) कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मेट्रो-३ प्रकल्पाचा ३४ वा भुयारीकरणाचा टप्पा आज यशस्वीरीत्या पूर्ण केला. चर्चगेट ते हुतात्मा चौक अप लाईन मार्गाचे हे ६४८ मीटरचे भुयारीकरण २९२ दिवसांत झाले. ५०६ सिमेंट रिंग्जचा वापर त्यात करण्यात आला. सूर्या-१ या रॉबिन्स बनावटीच्या ड्युएल-मोड हार्ड-रॉक टनेल बोअर मशीनद्वारे हे भुयारीकरण करण्यात आले. हुतात्मा चौक हे मेट्रो-३ मार्गावरील महत्त्वाचे स्थानक आहे.

